# बीजांकुर

शांताराम आठवले

स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ३३
२-७-१९८०




REFBK-0006038
REFBK-0006038

ક્રમ. ૧૨૦૬
૧।૭।૪૦
નોંધનં. ૮૮૯

मनोहर ग्रंथमाला प्रकाशन १६ वें.

# बीजाङ्कुर

दा. क्र. ६०३८

शान्ताराम आठवले

REFBK-0006038


ऑगस्ट १९४० ]

[ किंमत १। रु.

प्रकाशक
**मनोहर म. केळकर,**
मनोहर ग्रंथमाला, टिळक रोड, पुणें.

( या व पुढील आवृत्तींचे सर्व प्रकारचे हक्क लेखकाच्या स्वाधीन )

मुद्रक
**श्रीपाद रघुनाथ राजगुरु,**
राजगुरु प्रेस, कॉमनवेल्थ कॉलनी,
४०५ नारायण, पुणें २.



## राजा नेने

माझे स्नेही व
'प्रभात'चे एक उगवते दिग्दर्शक

यांस

# लेखकाचें पान

'एकलें बीज' नोव्हेम्बर १९३८ मध्यें प्रसिद्ध झालें. त्यानंतर २ वर्षांच्या आंतच ' बीजाङ्कुर ' प्रकाशित होण्याचा योग येत आहे.

'बीजाङ्कुरां'तील कवितांचें लेखन १७ फेब्रुवारी १९३९ ते मार्च १९४० या कालावधींत झालेलें आहे.

'एकलें बीजा' पेक्षां 'बीजाङ्कुरां'तील बहुसंख्य कविता वेगळ्या वळणाची आहे. या वेगळ्या वळणाचा अवलम्ब केवळ टूम म्हणून लेखकानें केलेला नाहीं. नव्या वळणाची प्रत्येक कविता सहेतुकपणें लिहिली गेली आहे.

'बीजाङ्कुरां'तील कविता नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असतां माझ्या अनेक स्नेह्यांनीं त्यांबद्दल भिन्न भिन्न अभिप्राय प्रकट केले. कांहींना ही नवी पद्धत आवडली म्हणून त्यांनीं अभिनंदन केलें, तर कांहींना हा प्रकार न रुचल्यामुळें त्यांनीं आपलें असमाधान प्रकट केलें, त्या सर्वांचा मी सारखाच आभारी आहें. सर्वसामान्य वाचकांना मात्र ही नवी कविता चांगलीच आवडल्याचें लेखकास आढळून आलें.

'बीजाङ्कुरां'तील कवितांपैकीं 'पराचा कावळा' (पृ.६४)– 'अनुकरण' (पृ. ७०) या दोन कविता अनुवादित आहेत. बाकी सर्व कविता स्वतन्त्र आहेत. श्री. अत्रे यांचेवरील कविता त्यांच्या सम्मतीनें प्रकाशिली आहे. ती त्यांना आवडल्याचेंहि त्यांनीं कळविलें आहे.

माझे स्नेही श्री. र. गो. सरदेसाई, श्री. राजाभाऊ नेने, श्री. ग. खं. पवार, श्री. मनोहर केळकर, श्री. केशवराव भोळे, या सर्वांचें आपुलकीनें साहाय्य झालें आहे. प्रभातचे श्री. व्ही. शांताराम, श्री. के. नारायण काळे, श्री. अत्रे, श्री. अनन्त काणेकर, श्री. ना. ह. आपटे, श्री. दा. न. शिखरे इत्यादि थोर कलावन्तांनीं व लेखकांनीं मला वेळोवेळीं उत्तेजन दिलें आहे. या सर्वांचा मी ऋणी आहें.

# लेखकाचें पान

'एकलें बीज' नोव्हेम्बर १९३८ मध्यें प्रसिद्ध झालें. त्यानंतर २ वर्षांच्या आंतच ' बीजाङ्कुर ' प्रकाशित होण्याचा योग येत आहे.

'बीजाङ्कुरां'तील कवितांचें लेखन १७ फेब्रुवारी १९३९ ते मार्च १९४० या कालावधींत झालेलें आहे.

'एकलें बीजा' पेक्षां 'बीजाङ्कुरां'तील बहुसंख्य कविता वेगळ्या वळणाची आहे. या वेगळ्या वळणाचा अवलम्ब केवळ टूम म्हणून लेखकानें केलेला नाहीं. नव्या वळणाची प्रत्येक कविता सहेतुकपणें लिहिली गेली आहे.

'बीजाङ्कुरां'तील कविता नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असतां माझ्या अनेक स्नेह्यांनीं त्यांबद्दल भिन्न भिन्न अभिप्राय प्रकट केले. कांहींना ही नवी पद्धत आवडली म्हणून त्यांनीं अभिनंदन केलें, तर कांहींना हा प्रकार न रुचल्यामुळें त्यांनीं आपलें असमाधान प्रकट केलें, त्या सर्वांचा मी सारखाच आभारी आहें. सर्वसामान्य वाचकांना मात्र ही नवी कविता चांगलीच आवडल्याचें लेखकास आढळून आलें.

'बीजाङ्कुरां'तील कवितांपैकीं 'पराचा कावळा' (पृ.६४)– 'अनुकरण' (पृ. ७० ) या दोन कविता अनुवादित आहेत. बाकी सर्व कविता स्वतन्त्र आहेत. श्री. अत्रे यांचेवरील कविता त्यांच्या सम्मतीनें प्रकाशिली आहे. ती त्यांना आवडल्याचेंहि त्यांनीं कळविलें आहे.

माझे स्नेही श्री. र. गो. सरदेसाई, श्री. राजाभाऊ नेने, श्री. ग. खं. पवार, श्री. मनोहर केळकर, श्री. केशवराव भोळे, या सर्वांचें आपुलकीनें साहाय्य झालें आहे. प्रभातचे श्री. व्ही. शांताराम, श्री. के. नारायण काळे, श्री. अत्रे, श्री. अनन्त काणेकर, श्री. ना. ह. आपटे, श्री. दा. न. शिखरे इत्यादि थोर कलावन्तांनीं व लेखकांनीं मला वेळोवेळीं उत्तेजन दिलें आहे. या सर्वांचा मी ऋणी आहें.

'बीजाङ्कुर'-छपाईच्या कामीं राजगुरु प्रेसचे व्यवस्थापक श्री. गानू व मुद्रितांच्या बाबतींत कटाक्षानें दक्षता बाळगणारे श्री. महाजन यांचें अमोल साहाय्य स्नेहभावानें लाभलें. 'बीजाङ्कुरां'तील कांहीं चित्रें मुंबईचे प्रसिद्ध चित्रकार श्री. दलाल यांनीं माझ्या मनाप्रमाणें काढून दिलीं. मुखपृष्ठावरील चित्र ऑर्ट कॉर्नरचे श्री. वसंत केळकर यांचें आहे. या सर्व मित्रमंडळींचा मी कृतज्ञ आहें.

'बीजाङ्कुरां'तील कवितांना प्रसिद्धि देणाऱ्या 'विविधवृत्त', 'झारापकर', 'अग्रणी', 'नवयुग', 'वाङ्मयशोभा' इत्यादि नियतकालिकांच्या संपादकांचा व चित्रांचे ठसे वापरण्यास परवानगी देणाऱ्या 'झारापकर', 'आनंद' व 'वाङ्मय-शोभा' यांच्या चालकांचा मी आभारी आहें.

प्रभातनगर, पुणें.<br>ता. ७ जुलै १९४०.

शान्ताराम आठवले

# अङ्कुरक्रम

पृष्ठ


१ बीजाङ्कुर ... ...
२ कल्चर्ड मोतीं (साचित्र) ... ... १
३ जीव द्यावयाचें विसरलों (सचित्र) ... ... ३
४ श्वानविलाप ... ... ५
५ आहों माणसें आपण (साचित्र) ... ... ६
६ तडजोड ... ... ८
७ नवी नटी (सचित्र) ... ... ९
८ वाङ्मयसम्राट् ... ... १०
९ अर्वाचीन कौसल्येचे डोहाळे ... ... १२
१० मित्रमन आणि चित्रसदन ... ... १३
११ दोन वेडे ... ... १४
१२ मुद्द्याची गोष्ट ... ... १५
१३ आकाशांतील मवाली ... ... १६
१४ रूपान्तर ... ... १७
१५ एका अमेरिकन मुलीचा हट्ट ... ... १८
१६ मुखवटे ... ... १९
१७ नागीण (सचित्र) ... ... २०
१८ गौळण ... ... २२
१९ *Quo Vadis* ... ... २४
२० दम्भ ... ... २५
२१ शिष्यात् इच्छेत् पराजयम् ... ... २६
२२ प्रेम आणि पोस्टाचें तिकिट ... ... २७
२३ प्रीति आणि शक्ति ... ... २८
२४ प्रेम आणि साप (सचित्र) ... ... २९
२५ हृदयशल्य ... ... ३२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | कलावन्त आणि कोल्हाटी | ... | ... | ३३ |
| २७ | श्राद्ध आणि साम्यवाद | ... | ... | ३४ |
| २८ | सफल मनोरथ | ... | ... | ३५ |
| २९ | शेतकरी आणि 'भाई' (सचित्र) | ... | ... | ३७ |
| ३० | विमान– पूर्वी आणि आतां | ... | ... | ३८ |
| ३१ | आधुनिक दुःशासनाची कैफियत | ... | ... | ३९ |
| ३२ | दोन 'बाला' | ... | ... | ४२ |
| ३३ | मुलीची जिज्ञासा | ... | ... | ४३ |
| ३४ | भविष्य | ... | ... | ४४ |
| ३५ | शीलं परं भूषणं | ... | ... | ४५ |
| ३६ | उल्कापात | ... | ... | ४६ |
| ३७ | निसर्ग आणि चहा | ... | ... | ४७ |
| ३८ | कविता आणि वनिता | ... | ... | ४८ |
| ३९ | देवदर्शन | ... | ... | ४९ |
| ४० | विरक्ताचे अन्तिमोद्गार | ... | ... | ५० |
| ४१ | साक्षरताप्रसार (सचित्र) | ... | ... | ५१ |
| ४२ | विचित्र अट | ... | ... | ५२ |
| ४३ | जेवण आणि मरण | ... | ... | ५३ |
| ४४ | खालीं आणि वर (सचित्र) | ... | ... | ५४ |
| ४५ | वस्तुस्थिति ! | ... | ... | ५५ |
| ४६ | निष्ठुर न्यायाधीश | ... | ... | ५६ |
| ४७ | दैववाद | ... | ... | ५७ |
| ४८ | झुळे | ... | ... | ५८ |
| ४९ | दादा लेखराज | ... | ... | ५९ |
| ५० | हलवाई | ... | ... | ६० |
| ५१ | गूढ | ... | ... | ६१ |
| ५२ | कौतुक | ... | ... | ६२ |
| ५३ | सन्तोषभुवन | ... | ... | ६३ |
| ५४ | पराचा कावळा | ... | ... | ६४ |
| ५५ | साम्यवाद | ... | ... | ६५ |

५६ दोन 'दगड' ... ... ६६
५७ स्त्री आणि आवळे ... ... ६७
५८ योगधाम ... ... ६८
५९ बाल नागरिकाचें गाऱ्हाणें ... ... ६९
६० अनुकरण ... ... ७०
६१ प्रेमिकाचा– तो– ? ... ... ७१
६२ चन्द्रामावशीचें ताक ... ... ७२
६३ विपरीत रति ... ... ७३
६४ 'पुरोगामी' पुणें ... ... ७४
६५ लाडू आणि लघुकथा ... ... ७५
६६ कल्पना करा ... ... ७६
६७ प्रौढ कुमारी ... ... ७७
६८ शोध ... ... ७८
सन्त 'ज्ञानेश्वर'मधील पद्यें ... ... ८१ ते ९०
आवश्यक टीपा ... ... ९१

# दुधाची तहान———!

धुळें, ता. ३१-३-४०

प्रिय शांताराम,

तुमचें पत्र नि कविता पोंहोचली. कविता चांगली आहे.

आपल्या पुस्तकाला प्रस्तावना मी जरूर लिहीन; पण मे महिना-अखेरपर्यंत मला मुळींच वेळ नाहीं; प्रवासांत माझींच कामें करतां करतां तारांबळ उडते, म्हणून दुसरें काम अंगावर घेणें शक्य नाहीं. मे महिनाअखेरपर्यंत तुम्हांला धीर असल्यास मी हें काम जरूर करीन. **तुमच्या काव्याचें रहस्य मी उत्तम तऱ्हेनें व्यक्त करूं शकेन;** पण त्याला मानसिक स्वास्थ्य नि सवड पाहिजे. तर ह्याप्रमाणें उत्तर यावें.

आ.

**प्र. के. अत्रे**

**टीप**– आचार्य अत्रे यांच्या वरील पत्राप्रमाणें लेखकानें प्रस्तावनेसाठीं ता. ७ जुलैपर्यंत धीर धरला. पुस्तक छापून तयार असल्यामुळें व यापुढें आणखी वाट पाहणें अशक्य झाल्यामुळें आचार्यांच्या प्रस्तावनेशिवायच निरुपायानें पुस्तक प्रसिद्ध करावें लागत आहे. आणखी थोडी वाट पाहण्यासहि हरकत नव्हती; परंतु आचार्य अत्रे यांस प्रस्तावना लिहिण्याइतकी सवड सध्यां नसल्याचें निश्चित त्यांचेकडून कळल्यामुळें प्रस्तावनेची दुधाची तहान– त्यांच्या या पत्रानेंच भागवावी लागत आहे.

—शान्ताराम आठवले

# बीजाङ्कुर

“ पात्र सरितेचें वळण जसें घेई
तसा पालट कवितेंत तुझ्या होई !

आळवावें मृदु मधुर भावनांना
आणि रिझवावें रसिक सन्मनांना !

अशी कविता निर्मिली ज्या कवीनें
‘विटम्बावें’ तिजलाच अतां त्यानें

दृश्य रसिकां हें गमे दुक्खदायी ! ”—
मित्र टीका करितात अशी कांहीं ! !

* * *

‘ नरें केला नर हीन आणि दीन ! ’
घोर जीवन-सङ्गरीं हें बघून !

हृदयिं प्रतिमा हो भग्न भावनांची
कळा उद्याना येत स्मशानाची ! !

कुठुनि यावा मग ओघ भावनांचा ?
कवी आतां ‘ऐसें’च गावयाचा ! !

* * *

‘ जशी अनुभूती– तशी अभिव्यक्ती ’—
हेंच माझ्या साङ्गती काव्यपङ्क्ती ! !

# कल्चर्ड-मोतीं ( पृ. १ )



मोतीं १ ला



मोतीं २ रा



मोतीं ३ रा

बा. क्र. ६०३६
नोंद ... १२०६
१८।३।७०

## कल्चर्ड मोती

चन्द्रकला

—१—

इतिहासामाजी गाजलें क्षत्रियकुल थोर !
वंशज हा त्याचा उगवता तेजस्वी पोर !

सळसळतें याचें क्षणोक्षणिं क्रान्तीस्तव रक्त !
दैव त्यास लावी व्हावया शान्त गान्धिभक्त ! !

रणाङ्गणावरती जायचा सेनानी म्हणुनी—
'शान्ति-दला'चा तो अग्रणी झाला बुद्ध मुनी ! !

मांसभक्षकाच्या कपाळीं आली बासुन्दी
विसरावें दुक्खा परन्तु हाय ! मद्यबन्दी ! !

—२—

परिट-घडीवरती अचानक उडला 'मुखरङ्ग'
ऐन विशीमध्यें अरेरे ! हिचा प्रेमभङ्ग ! !

ग्रन्थ हिचा गाजे सुप्रजा कशी वाढवावी ? ! !
विद्वत्कुल तिजला भूषवी देउनिया पदवी ! !

दारोदार परी कशास्तव फिरते ही आज?
पुरवि जना 'टोप्या' नव्हे हो-'प्रगतीचा साज' !

—३—

व्याख्यानांमधुनी गर्जतो हा वारेमाप !
क्रोधानें पत्नी बोलतां हृदयीं थरकांप !!

प्राध्यापक गाढा शिकवितो हा तत्त्वज्ञान !
झुकत झुकत रात्रीं पोंचतो कुठें न अवधान !

'दिव्य' काव्य याचें क्रान्तिचा देइल मन्त्र जगा !
मन्त्रसिद्धिसाठीं लागतो परि 'हिरवा धागा' !!

# जीव द्यावयाचें विसरलों

चन्द्रकला

किती तिच्यासाठीं तेधवां वेडा मी झालों !
अन्तरली विद्या हाय ! मी पदवीला मुकलों ! !

ठाउक मज नव्हतें हृदय तें कुठें शरीरांत !
म्हणे तरी तेव्हां 'देवते ! हृदयीं तव मूर्त' ! !

* * *

आणि एक दिवशीं अचानक कानीं ये वार्ता—!
'लग्न तिचें झालें'— बधिरता येइ सकळ गात्रां ! !

साहवे न क्षणही जिवाला तीव्र दुक्खदाह !
आणि म्हणुनि वेगें गाठला कृष्णेचा डोह ! !

परी पोहणारा पुरांतिल मी तर विख्यात
जीव द्यावयाचें विसरलों, पडतां पाण्यांत ! !

लाभप्रद झालें जिवाला कृष्णेचें स्नान !
प्रेमव्याधीची मिळाली गङ्गेला घाण ! !

* * *


मार्गशीर्ष होता	सुमङ्गल तो सरता सरता
मजला नच पुसतां	मुहूर्तहि निश्चित करि माता !

शुभमङ्गल झालें	उसळला नवा प्रणयरङ्ग
बघतां बघतां तो	स्मृतींतहि नुरे प्रेमभङ्ग ! !


ही साक्षात् 'कमला'	चालुनी आली आज घरीं
दुक्ख न पदवीचें	अतां मी होइन व्यापारी ! !

कधीं कधीं ऐसें	विषांतुन अमृत ये हातीं
घडो अनेकांचा	मजपरी प्रेमभङ्ग जगतीं ! ! !

## जीव द्यावयाचें विसरलों ( पृ. ३ )



प्रसंग १ ला
अचानक कानीं ये वार्ता— लग्न तिचें झालें !



प्रसंग २ रा
जीव द्यावयाचें, विसरलों पडतां पाण्यांत !

जीव द्यावयाचें विसरलों ( पृ. ३ )



प्रसंग ३ रा

शुभमङ्गल झालें, उसळला नवा प्रणयरङ्ग [ पृष्ठ ४

'—आणि व्हायाचें तेंच घडुन आलें !
प्रेमभङ्गानें जिणें नको झालें !
दिव्य प्रेमास्तव— म्हणुन दिला प्राण ! !
—पुनर्जन्मीं जाहलों अतां श्वान ! ! !'

—'तदा अविवेकें घडे आत्मघात !
अतां अनुतापें पोळतसे चित्त ! !
दुक्ख दारुण त्यामुळें मनीं दाटे—
रडावेंसें भेसूर असें वाटे ! !'

—" हृदय ज्याचें अनुतापतीर्थि न्हालें !
—मुक्ति त्याला—जरि पाप घोर झालें "
—असें बोले भगवन्त अर्जुनातें
तत्त्व नुमजे परि मूढ मानवातें ! !

ना तरी मी लागतां रडायास
अशुभ मानुनि कां करिति प्रहारास ?'

## आहों माणसें आपण

ओवी

'प्रेम' शब्द उच्चारितां नको जाऊं बावरून
माझी व्यवहारी भाषा गद्य नीरस ऐकून !

रूपगुणें साधारण मी तो मध्यम तरूण
सद्गुणाची सौन्दर्याची तूंही नाहींस गे खाण !!

सम्पत्तीची वैभवाची दोघांच्याही कुळीं वाण !
परी जाहलें निर्माण सहवासें आकर्षण !!

होऊनीया जोडीदार थाटूं सन्तोषें संसार
दुक्ख-सुखामधीं होऊं एकमेकांस आधार !!

मी तो पुरुष राकट करायचा धुसफूस !
कधीं होऊन प्रसन्न तुझी पुरवीन आस !!

माझे कष्ट प्रामाणिक तुझें सौजन्य सोशीक !
शान्ती-समाधानासङ्गें करूं स्नेह-सोयरीक !!

नको वास ढगावरी नको अनन्त सागरीं
राहूं स्थिर भूमीवरी आणि माणसाच्यापरी !!

## आहों माणसें आपण

ओवी

'प्रेम' शब्द उच्चारितां नको जाऊं बावरून
माझी व्यवहारी भाषा गद्य नीरस ऐकून !

रूपगुणें साधारण मी तो मध्यम तरूण
सद्गुणाची सौन्दर्याची तूंही नाहींस गे खाण !!

सम्पत्तीची वैभवाची दोघांच्याही कुळीं वाण !
परी जाहलें निर्माण सहवासें आकर्षण !!

होऊनीया जोडीदार थाटूं सन्तोषें संसार
दुक्ख-सुखामधीं होऊं एकमेकांस आधार !!

मी तो पुरुष राकट करायचा धुसफूस !
कधीं होऊन प्रसन्न तुझी पुरवीन आस !!

माझे कष्ट प्रामाणिक तुझें सौजन्य सोशीक !
शान्ती-समाधानासङ्गें करूं स्नेह-सोयरीक !!

नको वास ढगावरी नको अनन्त सागरीं
राहूं स्थिर भूमीवरी आणि माणसाच्यापरी !!

झरे, वारे आणि तारे    दिव्य आकाशमन्दिरें
वैभव हें सुरक्षित    राहो काव्यग्रन्थीं सारें !!

तुझ्या माझ्या संयोगानें    पूर्ण होईल जीवन
प्रेम जीवांचें मीलन,    नव्हे स्वर्गसुधापान !

तुझा येऊनी नकार    जरी अन्तरे मीलन
दुक्ख होईल, परन्तु    मी न सोडणार प्राण !!

प्रेम माझें नसे दैवी    प्रेम नाहींच पाशवी
आहों माणसें आपण    प्रेम माझें गे मानवी

पतिः— हें सुस्वरूप तुज कशास विधिनें दिलें ?
होउनी राहसी कां माझें 'बाहुलें' !
सौन्दर्य लागुं दे जगताच्या कारणीं
हो नटी कलेच्या विराज सिंहासनीं !!

* * *

(स्वगत) तुज चढेल वेगें तिथें कलेची निशा—
मी निरसिन इकडे 'अबलां'ची दुर्दशा !!


× × ×

पत्नीः— मन किती इकडचें उदार मज ठाउक
जगिं विरळच असलें 'रमणी'चें कौतुक !
करि विरह-कल्पना हृदयीं कासाविसी—
तरि करिल अवज्ञा पतिची, गृहिणी कशी ?

* * *

(स्वगत) बोलकें पांखरूं सुटलें बन्दींतुन
नाचेल कलेचीं मृदुल पिसें लावुन !!

नवी नटी ( पृ. ९ )



बाबी:— ‘खेळ आम्हीं पाहिला आज एक
किती त्यांतिल ती नायिका सुरेख !
कशी करिते ती नाच उड्या घेते !
नांव परि मी विसरून तिचें जातें !’

बाबा:— ‘नटी हां-हां- ती नवी भाग्यशाली—
नांव तीचें—कां हांसतेस गालीं ?’

बाबी:— ‘नव्हे बाबा तो खेळ सिनेमाचा-!
घरापुढती—गोजिऱ्या माकडीचा ! !
धनी ठेवी तिज नांव गोड मोठें—
काय—अय्या !- विसरून मीच जातें !’

–१–

'लेख, कविता, लघुकथा मुळीं कांहीं—
चला जा जा मिळणार तुम्हां नाहीं
'खास' असुं दे वा असो--सखा–अङ्क
नाहिं नाहीं मिळणार ओळ एक!'—

वदुनि रागानें पेटवी चिरूट
थोर लेखक तो सोडि धूर-लोट!!

–२–

किती आला जरि वरी महापूर—
लव्हाळीं तीं राहतीं जशीं स्थीर!
नम्र सम्पादक धरुनि उरीं धीर
लेखकाच्या दारांत उभा-वीर!

हळुच बोले तो होउनी मवाळ–
"प्रसिद्धीला राहिला अल्प काळ!

नोंद नं. ७८८
क्रमांक १२०८
१।२।५०

गोष्ट चिवड्यांची गोड एक आली
आणि वडक्यांनीं कबुल असे केली !

कथा न मिळे आपली खास अक्का !
बसवुं सिंहासनिं काय मांडलीका ?"

—३—

बाण वर्मीं लागला लेखकाच्या
आणि आठ्या उतरल्या कपाळीच्या
म्हणे गर्जुनि, "ते क्षीणदीप सारे—
क्षुद्र निष्प्रभ ते मजपुढें बिचारे

उभे कां हो—या बसा असे नीट
अरे पोरा—जा सांग चहा आंत !!"
चिरूटाचा लागला सुटूं धूर
धूर नोहे अनिवार अहंकार !

"मासिकाला पुरतील एक साल—
वाचकांना मोहिनी घालतील—
कथा ऐशा देईन या घडीला
वृथा वाङ्मयसम्राट हा कशाला !!"

## अर्वाचीन कौसल्येचे डोहाळे 

जाउनी दिवस लागले तिला डोहाळे
त्यांतही गरोदरपण हें पहिलें-वहिलें !

जरि पगारांत हो कपात दुर्दैवानें
तरि सौभाग्याचीं घरीं वाढतीं चिन्हें !

लाडकी गर्भिणी उठुनी थोर सकाळीं
आळवूं लागली श्रीहरिची भूपाळी !

भासली तयाला देवी निज वेल्हाळी—
जणुं कौसल्या जी प्रभुमय होउनि गेली ! !

हर्षानें येई घेउनी सायङ्काळीं
टवटवीत सुमनें आणि फळें रसरसलीं

मनिं म्हणे, 'वानगी रुचेल ही रसिकेला
जाणे न सतीचें हृदय पती तो कसला ?'

पाहुनी भेट ती भावी माता वदली—
'यापरीस असती 'भेळ' मला आवडली ! !'

## मित्रमन आणि चित्रसदन

चन्द्रकला

भररस्त्यावरती चित्रपटसदन डौलदार
मिश्र समाजांत तसा हा शोभे भरदार !

चित्रघरांतील रजतपट काळोखामधला !
अंतर-पट त्याच्या शरीरीं तसाच दडलेला !

चार-दोन दिवसां नवें ये पडद्यावर चित्र
हृदयपटीं त्याच्या प्रीतिची नित्य नवी मूर्त !!

# दोन वेडे

चन्द्रकला

—१—

सम्मेलन भरलें    पहा हें विद्या-भक्तांचें
कडकडती टाळ्या    चाललें भाषण कोणाचें ?
लेखक विख्यात    'सभापति' म्हणुनी सावेश
प्रज्ञावन्तांना    देतसे ऐका सन्देश—
'ललित-लेखनाचे    फाटके सान्धु नका जोडे
ध्येयपूर्तिसाठीं    बन्धुनो ! वेडे व्हा वेडे ! !'

—२—

हें तर वेडचांचें    इस्पितळ—करित हातवारे—
वेडचांना वेडा    साङ्गतो, 'निजहित परिसा रे !
जमुनी व्यर्थ इथें    अपव्यय करितां काळाचा
सूज्ञ जगा करणें    असे हा जन्महेतु तुमचा !
धरा जरा चित्तीं    जीवन-ध्येयाची चाड
गळतीं तरुपर्णें    तसें हें टाकुनि द्या वेड ! !'

## मुद्द्याची गोष्ट

चन्द्रकला

ठाणे.

[ सुनीताचा एक नवा प्रकार! ]

सूर्याजीराव बुडाले    मद्यसागरांत !
उगवतील फिरुनी    सुधेनें विश्व सारवीत !

गर्भ नको होऊं    साङ्गता येइल बीजाला !
फिरुनि अतां कुङ्कू    लावतां येतें विधवेला !

शक्य असे कविला    सजविणें प्रेमाविण कविता
असला जरि पुढतीं    दर्पणीं बघणार न वनिता ! !

गचाळ ग्रन्थाची    निघेलहि दुसरी आवृत्ती !
अन् शिवतां येतीं    फाटलीं प्रेमाचीं पोतीं ! !

सुबत्तेंतसुद्धां    प्रजेला मिळेल करसूट
आणिक गान्धीही    घालतिल विलायती सूट ! !

( असो ! असे देऊं    वाढवूं कशास दृष्टान्त
सोडुनि पाल्हाळा    साङ्गतो मुद्द्याची गोष्ट ! )

—परन्तु पचलेलें    फण्डधन गुण्डांच्या उदरीं
कुठल्याही रूपें    अशक्यच मिळणें माघारीं ! !

# आकाशांतील मवाली

भूपतिवैभव

हे शरदृतूंतिल मेघ पाण्ढरे सगळे
बेकार मवाली गमती गगनामधले !

पोषाक पाण्ढरे चढवुनियां अङ्गांत !
रेङ्गाळत कोणी, फिरति कुणी डौलांत ! !

निश्चिन्त—जयांचीं हृदयें न कधीं द्रवती
हे गुण्ड आळशी—गगनपुरातें छळिती ! !

मैफलींत रविच्या सायङ्काळीं घुसती
मनसोक्त प्राशिती—छे--मदिरामय होती ! !

धुन्दींत मस्त मग झुकत आडमार्गाला
गाठिती—गांजिती—मोहक तारा-बाला ! !

लावितां कशाला शोध मङ्गळावरले ?
हे पहा आपुले 'भाई' गगनामधले ! !

## रूपान्तर

चन्द्रकला

भूवरुनी गगनीं विपुल जल बाष्परूप जातें
पाउस म्हणुनी तें पुनरपि भुवनीं अवतरतें !

झिरपुनि त्यामधलें धरणिच्या उदरीं जें लपतें
मृदु पल्लवरूपें मूर्त तें वृक्षांवर होतें !

लतिका-कलिकांना आपुला जीवनरस देती
विकसित कलिकांचीं सुवासिक सुमरत्नें होतीं !

सुमनें हीं गमती प्रीतिचे प्रामाणिक दूत !
जीवन सुकवीती आपुलें प्रीतिवर्धनार्थ !

सत्कविहृदयीच्या भावना आणिक अनुभूती
शब्दरूप घेती प्रगटतें दिव्य काव्य जगतीं !

# एका अमेरिकन मुलीचा हट्ट

चन्द्रकला

मुलगीः— ही हिन्दी साडी आज मज नेसव आई ग !
आईः— हट्ट असा भलता मुलांनीं घेऊं नाहीं ग !
मुलगीः— नको तुझा खाऊ उगीचच धाक नको दाऊं
नेसव ती साडी आणि मग फिरावया जाऊं ! !

* * *

नेसवितां साडी बालिका नाचे हर्षानें
आणिक मातेच्या मनाला म्हटलें काय मनें—

" शपथविधी आज व्हायचा तुझा मण्डळांत
ध्येय मण्डळाचें 'रुजविणें जगीं नग्नपन्थ' !
प्रगत तुझ्या हृद्या वाटतो वस्त्रांचा वीट !
सान अज्ञ बाला धरी ही साडीचा हट्ट !
मिळल्याविण साडी न घेई मुखांत ती अन्न !
अन्न नसे घेणें आज तुज झाल्याविण नग्न ! ! "

नगरांत चालला उत्सव चोहींकडे
वाजतात सनया दुमदुमती चौघडे !

ही रस्त्यामधुनी बालचमू मिरवते
घालुनी मुखावर नानापरि मुखवटे

*　　　*　　　*

आपणहि घेतों नित्य जीवनोत्सवीं
हीं अशींच सोङ्गें बहुरङ्गी नवनवीं

भावना हृदयिच्या दडवुनि अन् चुरडुनी
नाचतो मुखवटे खोटे वर चढवुनी ! !

भरलें नगरीं भव्य प्रदर्शन !
  विश्वांतिल विविधता चमत्कृति— !
  कल्पकता–रसिकता–संस्कृती—
  बहुविधरूपें इथें विलसती !
मनुजबुद्धिचें जणुं हें नर्तन !

विभाग छोटा एका बाजुस !
  आकर्षक तो टापटिपीचा—
  'शास्त्रें' आणिक आरोग्याचा !
  अभाव तेथें 'रसिक' जनांचा !
तिथें रङ्गलें माझें मानस !

भरुनि ठेविल्या बरण्यांमधुनी !
  सर्पाच्या या नाना जाती—
  'मण्यार', 'फुरसें', 'नाग', 'ननाटी' !
  'विषमय हे'—'हे निर्विष असती'
फलक ठेविले असे टाङ्गुनी !

नागीण ( पृ. २० )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६०३८




सजीव तूं दिसतेस नागिणी !

आणि कोण ही उभी कडेला ?
स्वयंसेविका तरुण देखणी
रङ्ग केतकी, नाजुक जिवणी !
लाम्बसडक पाठीवर वेणी —
खळी पडे ती हसतां गाला !

उठले माझ्या बोल अन्तरीं—
" सजीव तूं दिसतेस नागिणी !
मिरविसि मोहक सळसळ करुनी !
जात तुझी पण कुठली रमणी ?
'निर्विष' अथवा 'विषमय गहिरी' ?"

काल ही गोपी यमुनाजळीं—
उतरली, तोंच चोर-पाउलीं !—
येउनी हरीनें अधरसुधा प्राशिली ! !

विसरली देहभान गौळण !
चालली रिताच घट घेउन !
अन् म्हणे, 'यामधें भरला यदुनन्दन !'

हरीच्या मायेनें मोहिली !
कृष्णमय वृत्ति हिची जाहली !
लगबगा अतां ही मथुरेला चालली !

शिरावर घे गोरस-घागरी
हरीची घुमते मनिं बांसरी !
भारली कशानें नजर हिची नाचरी ?

फुटलें कधींच नभिं ताम्बडें !
आरवुनि विसावले कोम्बडे !
पूर्वेस उगवलें रक्तबिम्ब केवढें ! !

मैत्रिणी कितीदां हाकारुनी
झटकल्या पुढतीं रागेजुनी !
राहिली दङ्ग ही 'स्वप्नां'तच रङ्गुनी ! !

पातली हाटीं दाटींतुन !
थबकते मधेंच का दचकुन ?
जातसे शिरीरी देहावर थरकुन ! !

डोइवर दुभत्याच्या घागरी !
मुखानें गजर सारखा करी—
'घ्या कृष्ण मुरारी !—घ्या हो कुणि घ्या हरी ! !'

# 'Quo Vadis'

मञ्जिरी

रहदारी होती रस्त्यांतिल थाम्बली
मी बघत चाललों आपुलीच साउली !
तों मागुनि आला छकडा रेङ्गाळत
भेसूर भसाडें गाडीवान रेकत !

मीं म्हटलें पाहूं कोण आंत बैसलें !
कुठलें तरि होतें प्रेत तिथें पहुडलें !
छकड्यावर होती जाहिरात डकविली—
'चाललास कोठें ?—' तींहि सहज वाचली ! !

## दम्भ !

दिण्डी

'देव म्हणजे थोताण्ड जगीं आहे'—
सिद्ध करुनी जिङ्किली सभा त्यानें

मनीं माझ्या ये दाटुनी प्रमोद
अर्पिले मीं गौरवें धन्यवाद—

'ज्ञान सुहृदा ! किति गाढ तुझें आहे !
आणि वाणी गङ्गौघ जणूं वाहे !'

म्हणे हासुन तो सहज लीनतेनें
'सर्व लाभे हें ईश्वरी कृपेनें' ! !

## शिष्यात् इच्छेत् पराजयम्

दिण्डी

असुनि गणिका घे मन्त्र सद्‌गुरूचा
ध्यास लागे तिज ध्यानधारणेचा !
मूर्ति गुरुची एकाग्र मनीं चिन्ती
दिव्य मोदाची तिला ये प्रचीती ! !

*　　　*　　　*

आणि बसतां सद्‌गुरू वनीं ध्यानीं
नेत्र मिटतां गणिकाच पुढें येई
चित्त चळलें हो विफल तपश्चर्या
धरी वेगें जाउनी शिष्य-पाया ! !

## प्रेम आणि पोस्टाचें तिकिट!

भूपतिवैभव

तीः— 'निर्लज्जपणाची सीमा तुमच्या झाली !
आहांत मवाली—निघा चला व्हा खालीं !

वाटलांत वरुनी सज्जन साधेभोळे
समजलें शेवटीं पुरुष सारखे सगळे !!'

तोः— स्वप्नांत जाहला मजला साक्षात्कार !
कीं— धनिक कन्यका करिल तुझा स्वीकार !

त्यासाठीं केलें धीट तुम्हांवर प्रेम—
(जें असे नेहमीं पवित्र अन् निष्काम ! !)

जाउं द्या प्रेम ! कटु शब्द नका उच्चारूं
मागणी नका ही शेवटची धिक्कारूं—

कळवितों पित्याला वृत्त प्रेमभङ्गाचें
द्या पत्रासाठीं तिकिट एक आण्याचें ! !'

दिण्डी

कवी म्हणुनी मिळविली जगीं कीर्ती
कष्ट केले—जागुनी—दिवसरात्रीं !
दिसति हाडें— बैसले जरी गाल
विचारानें तो सत्कवी सखोल !

*　　　*　　　*

वर्ष त्याच्या जाहलें विवाहाला
वर्षदिन तो साजरा असा झाला—

कवि :— “ तुझ्या प्रीतीनें दिला दिव्यमन्त्र
आणि प्रगटे हा भव्य काव्यग्रन्थ !
वाहिला हा देवते ! तुझ्या पायीं
प्रेमभावें सखि ! एकवार पाही ! !

पत्नी :- “ व्यर्थ कष्टुनि लिहुं नका काव्यपङ्क्ती
जरी झाली होउं द्या क्षीण कीर्ती !
सुखी व्हावें वाटतें जरी पत्नी—
तरी मिळवा आरोग्य आणि शक्ती ! !

प्रेम आणि साप (पृ. २९)



मीहि ओरडलों 'साप! अरे बाप!'

तरुण आणिक अर्थात देखणी ती !
जिला बघुनी कळवळा उठे पोटीं !
हाय ! कुङ्कू नव्हतेंच भव्य भाळीं
जरी फुललें तारुण्य लाल गालीं ! !

असावी ती शिक्षिका ध्येयवादी !
सदा अङ्गावर स्वच्छ शुद्ध खादी !
'रसिक' ऐसा 'शेजार' नवा आला !
जीव माझा हर्षला भुकेलेला ! !

—भुकेलेला मी सदा प्रीतिसाठीं
रोज वाची शेंकडों 'प्रेमगोष्टी'
त्यांत तरुणांवर मुली फिदा होती !
हाय ! लाभे मज अजुनि कुणी ना 'ती' !

करूं म्हटलें हळुहळू अतां दोस्ती !
स्नेह आधीं-- मग पुढें दिव्य प्रीती ! !
परी लावुनि ती बसे सदा दार !
आणि बोले मोजके शब्द चार ! !

बळें द्यावीं पुस्तकें वाचण्याला !
ज्यांत भरल्या शृङ्गार-प्रेम-लीला ! !
सहज हासत ती परत करी ग्रन्थ !
हास्य सुचवी--' हें मज नसे पसन्त ! ! '

प्रणय-गीतें मीं नित्य गुणगुणावीं !
आणि फोनोवर कधीं वाजवावीं !
असे नाना मीं योजिले उपाय !
परी जवळीं येई न 'मधुर-ध्येय' !

धीट होउनि एकदां सुप्रभातीं
फुलें सुन्दर मीं दिलीं तिच्या हातीं !
तिनें हासत साभार परत केलीं !
'देव नसती मजकडे'—ती म्हणाली ! !

—आणि दिनभर मग राहिलों उदास !
येत होती रात्रही सावकाश ! !
तोंच 'टकटक' बाहेर कुणी केलें—
आळसानें मीं द्वार खुलें केलें ! !

अहा ! दारीं ठाकली 'प्रेम-मूर्ती'
बोल ऐकुनि हर्षलों तिचे चित्तीं ! —

३१०५ १२०६
११२१२०

'काम आहे--खोलींत जरा येतां ?' —
मींहि म्हटलें,--'हो ! क्षण न घालवीतां !'

मनीं म्हटलें, मीं--'पुण्य फळा आलें !
बहुत दिवसांनीं ध्येय सफल झालें ! !
काय दुसरें असणार हिचें काम ? — '
—नाद घुमला सर्वत्र-- 'प्रेम'-'प्रेम' !!

तिनें माझ्या हातांत दिली काठी—
आणि म्हटलें रोखून प्रखर दृष्टी ! —
चुलीपाशीं पसरला असे साप !'
मींहि ओरडलों—'साप ! अरे बाप ! !'

*            *            *

प्रेम थिजलें ! गोठला सर्व धीर !
आणि मूर्च्छा पावला 'प्रेम-वीर' ! !

"प्रेम माझें निःसीम तिच्या ठायीं !
आणि हृदयीं पूजिते मला तीही !
सौख्य–सम्पत्ती–नसे कमी कांहीं !
परी हृदयाला दुःख एक दाही ! !"

—असें म्हणुनी तो श्वास दीर्घ सोडी
आणि जोरानें सिगारेट ओढी ! !
—हळुच म्हटलें मीं, 'करिन अल्प साह्य
दुक्ख मित्रा ! साङ्ग रे तुझें काय ?'

म्हणे यावर तो हासुनी उदास—
"सतत मित्रा ! तें जाळितें जिवास !
जिच्यावरती निःसीम असे प्रीती
हाय माझी ती असे धर्म-पत्नी ! !"

## कलावन्त आणि कोल्हाटी

सूर्यकान्त

—“ नव्या पिढीचे चित्रकार तुम्ही चतुर आणखी गुणी
म्हणुनि दिलें मीं काम तुम्हांला विपुल दाम देउनी !

भक्त कलेचे तुम्ही— आमुचें धन्द्यावर जीवन !
धन्द्यावांचुनि कसें कलेला मिळेल सञ्जीवन ?

—पहा निरखुनी तुम्हीं रेखिल्या रमणींच्या आकृती
पदर आपुले सावरती त्या फारच लज्जावती ! !

उरोभाग नच एकीचाही उघडा अन् उन्नत !
रसिकांना हीं ‘नीरस’ चित्रें करितिल कां मोहित ?

—कला उच्च ती नको अम्हांला देइ न जर ती धन
मुक्त तुम्हांला आजपासुनी केलें सेवेंतुन ! ! ”

"प्रेम माझें निःसीम तिच्या ठायीं !
आणि हृदयीं पूजिते मला तीही !
सौख्य–सम्पत्ती–नसे कमी कांहीं !
परी हृदयाला दुःख एक दाही ! ! "

—असें म्हणुनी तो श्वास दीर्घ सोडी
आणि जोरानें सिगारेट ओढी ! !
—हळुच म्हटलें मीं, 'करिन अल्प साह्य
दुक्ख मित्रा ! साङ्ग रे तुझें काय ?'

म्हणे यावर तो हासुनी उदास—
"सतत मित्रा ! तें जाळितें जिवास !
जिच्यावरती निःसीम असे प्रीती
हाय माझी ती असे धर्म-पत्नी ! ! "

## कलावन्त आणि कोल्हाटी

सूर्यकान्त

—“ नव्या पिढीचे चित्रकार तुम्ही चतुर आणखी गुणी
म्हणुनि दिलें मीं काम तुम्हांला विपुल दाम देउनी !

भक्त कलेचे तुम्ही—आमुचें धन्यावर जीवन !
धन्यावांचुनि कसें कलेला मिळेल सञ्जीवन ?

—पहा निरखुनी तुम्हीं रेखिल्या रमणींच्या आकृती
पदर आपुले सावरती त्या फारच लज्जावती ! !

उरोभाग नच एकीचाही उघडा अन् उन्नत !
रसिकांना हीं ‘नीरस’ चित्रें करितिल कां मोहित ?

—कला उच्च ती नको अम्हांला देइ न जर ती धन
मुक्त तुम्हांला आजपासुनी केलें सेवेंतुन ! ! ”

# श्राद्ध आणि साम्यवाद

सूर्यकान्त

'साम्यवाद' सुखदायक येइल भारतांत लौकरी'
साङ्गुनि ऐसें शिक्षक शिष्यां विषय विशद तो करी !

बुद्धिमान कुणि विद्यार्थी मग शङ्का गुरुला पुसे—
म्हणे– 'दुपारीं घरीं मिळालें भोजन मजला नसे—

श्राद्ध पित्याचें– बसले आधीं ब्राह्मण ते भोजना—
भटजींसङ्गें भोजन न मिळे कधींच इतरेजनां !

'साम्यवाद' येईल भारतीं सुखदायक जेधवां
दूर विषमता भोजनांतली होइल का तेधवां ?'

## सफल मनोरथ

सूर्यकान्त

वृद्ध पित्याचे सकल मनोरथ सफल आज जाहले !
पुत्र आणखी कन्येनेंहि 'पदवी'तें मिळविलें !

पाठीवरती हात फिरवुनी पुसे मुलीला पिता—
'ध्येय काय जीवनीं ?–ठरविला कार्यपन्थ कोणता ?'

दिलें सुशिक्षण तुला, लाडकी तूं मम 'लीलावती'
शब्द न फुटती पुढें– पित्याचे नयनहि ओलावती !

म्हणे सुकन्या– 'बाबा ! माझें ध्येय असे निश्चित !
तरुणी मी देखणी त्यांतही विद्येनें भूषित !

करिन कलेची सेवा–होइन स्वार्थत्यागी नटी !
याविण दुसरी पवित्र सेवा राष्ट्राची कोणती ?'

'तथास्तु' –बोले पिता आदरें 'विजय इच्छितों तुला !
मेजावरची भगवद्गीता आणुनि देई मला ! !'

* * *

आणि दुपारीं—पुत्रालाही प्रश्न विचारी पिता–
‘ ध्येय काय जीवनीं ?– ठरविला कार्यपन्थ कोणता ? ’

सुपुत्र बोले, ‘ बाबा ! माझें ध्येय असे निश्चित !
तरुण, देखणा, तडफदार मी विद्येनें भूषित !

करिन कलेची सेवा होइन ‘ दिग्दर्शक ’ मी भला !
मार्ग असे हा राष्ट्रोद्धारक एकमेव आगळा ! ’

‘ तथास्तु ’— बोले पिता आदरें ‘विजय इच्छितों तुला !
मेजावरती भगवद्गीता ठेवुनि दे ही मुला ! ! ’

शेतकरी आणि भाई ( पृष्ठ ३७ )



‘ पुढ्यांत पसरी कान्दा भाकर घरधनीण हासरी ’

—१—

भाद्रपदांतिल दुपार, आला माथ्यावर दिनकर !
भिजला सारा मळा— थाम्बली मोटेची भिरभिर !

——पाट झुळझुळे जवळीं, वरती आम्ब्याची साउली !

पुढ्यांत पसरी कान्दाभाकर घरधनीण हासरी !
शेतकऱ्याला रोज लाभते अशी सुधा-माधुरी ! !

—२—

वणवण करुनी सकाळपासुन थकले 'भाई' जन !
शेतकऱ्यांच्या 'प्रगती'साठीं लढति राजकारण ! !

—विश्रान्तिगृह नाक्यावरचें शान्त एक पाहिलें—

शिरले सगळे-- 'सिङ्गल' पिउनी भूक भागवावया !
नसति पुरेसे पैसे जवळी--मिसळपाव खावया ! ! !

## विमान—पूर्वी आणि आतां

पादाकुलक

प्रचण्ड घरघर ध्वनी करोनी !
विमान आलें प्रथमच गगनीं ! !
—अहा ! केवढें नवल वर्तलें ! !
सान-थोर जन बघती जमुनी !
चमत्कार तो स्तिमित लोचनीं !

*   *   *

काळ लोटला यावर कांहीं
आणि जाहली सुरू लढाई !

*   *   *

प्रचण्ड घरघर ध्वनी करोनी
विमान आतां येतां गगनीं !
—हाय ! केवढें अरिष्ट आलें ! !
—म्हणती--करिती जीवितरक्षण--
पळती—लपती—बावरती जन ! ! !

## आधुनिक दुःशासनाची कैफियत  चन्द्रकला

पैरण मलमलची   पाण्ढरी तुमानही तङ्ग !
ऐटबाज फेटा   तयाचा अस्मानी रङ्ग ! !

हे 'सर्जेराव'   कोण हो उभें पिञ्जऱ्यांत ?
गांव सर्व लोटे   कशास्तव न्यायमन्दिरांत ?

या सरदारानें   दुपारीं भररस्त्यावरती !
विटम्बिली बाला !   दाविली प्रखर वीरवृत्ती ! !

'विनयभङ्ग' खटला   गाजला सगळ्या प्रान्तांत !
आज परी दिसते   विशेषच जनता उत्कण्ठ ?—

चढली उत्कण्ठा   वाढली अफाट ही दाटी—
'सर्जेरावां'ची   कैफियत ऐकायासाठीं !

*  *  *

सर्जेरावः— " महाभारताचा   सूज्ञ हो ! करुनी अभ्यास !
विशाल दृष्टीनें   पहा— मग खुशाल द्या दोष ! !

जन्म असे माझा   जाहला कौरववंशांत !
आर्य पूर्वजांचे   सळसळे तेजस्वी रक्त ! !

गमतो युवतींना— देखणा ! जरि मी एकाक्ष !
विविध प्रेमपत्रें तयाची देतिल हो साक्ष ! !

नटुनि बाहुल्या या चालल्या खिदळत रस्त्यांत !
मीहि जात होतों डाम्बरी सडक न्याहळीत ! !

अङ्गावर आली पोर ही उद्धट अन् धीट !
उपहासुनि हसली मजकडे दावुनिया बोट !

शूरानें जगतीं करावा सहन न अपमान !
घावा वा घ्यावा प्रसङ्गीं मानास्तव प्राण ! !

अशीच उपहासें द्रौपदी हसली कुरुराया !
दुःशासन टपला वाघ तो क्रूर सूड घ्याया ! !

सभेमधें आणी— फरफरा ओढुनि पाञ्चाली !
प्रबल वीर मानी— निरीला हात तिच्या घाली !

'विनयभङ्ग' झाला 'भव्य' हा महाभारतांत !
पूज्य पूर्वजांची असे मीं अनुसरली वाट ! !

आर्य सुपुत्रांना जोंवरी अवमानिति अबला !
सौभाग्य न लाभे तोंवरी भारतमातेला !

न्यायदेवतेनें करावा माझा सन्मान !
आणिक तरुणांनीं धरावा माझा अभिमान ! !

परन्तु देशाला काळ हा अनिष्ट विपरीत !
मान भेकडांना— शूर ते पडती बन्दींत ! !

घोर शासनाची न वाटे लवही भीति मनीं
गौरवितों मज मी 'आधुनिक दुःशासन' म्हणुनी ! !

## दोन 'बाला'

दिण्डी

आज झालीं आजीस पुरीं साठ !
नात पाही आठवी वर्ष-गांठ !

हौस पुरली नेसली गोल साडी
दृष्ट आजी कौतुकें तिची काढी ! !

आणि बोले, 'ही छान असे चाल
मीहि नेसुनि पाहतें आज गोल ! !'

## दोन 'बाला'



आज झालीं आजीस पुरीं साठ !
नात पाही आठवी वर्ष-गांठ !

हौस पुरली नेसली गोल साडी
दृष्ट आजी कौतुकें तिची काढी !!

आणि बोले, 'ही छान असे चाल
मीहि नेसुनि पाहतें आज गोल !!'

## मुलीची जिज्ञासा

‘ आज पोळ्या तूं लाटल्या सकाळीं
त्यांस होतें लाविलें मऊ पीठ !
तेंच का हें पाण्ढरें या डबींत ?
आणि अय्या ! लाविशी तेंच गालीं ?’

---

## भविष्य

भीक मागतां पोटासाठीं
उल्टुनि गेली याची साठी !
        वसे ज्योतिषी रस्त्यावरती—
त्यास पुसे हा हात दावुनी
" भाग्य कधीं हो येइल उजळुनि ? "

## 'शीलं परं भूषणम्'

गणिकेचें ते विलासमन्दिर !
मूर्त तिथें शृङ्गार मनोहर !
परन्तु–'शीलं परं भूषणम् !'
वचन लाविलें ठळक दर्शनी !
म्हणुनच फिरती पाय न तिथुनी !'

निस्तेज शिळा होउनी नित्य भूवरी
पडतात तारका–चमकति ज्या अम्बरीं !
भासते उणीव न तेजाच्या सागरीं !
निखळल्या आजवर !–निखळतीलही पुढें
जाहलें तयांविण गगन कधीं बापुडें ?

## निसर्ग आणि चहा

श्लोक

फिरे स्वैर बेकार– पैसा न हातीं !
पहा फाटली प्रेमभङ्गांत छाती !
विटे जीव वाटे वनीं दूर ज़ावें
मुनीसारखें मुक्त स्वच्छन्द व्हावें !

इथें जीवनाचा न जञ्जाळ कांहीं—
वनीं शान्त एकान्त सन्तोषदायी !
निसर्गा ! नको अन्य कांहीं जिवाला
चहा मात्र येथें मिळो प्यावयाला !

## कविता आणि वनिता

सूर्यकान्त

भाङ्ग साधला सुरेख—
    जमली मोहक वेणीफणी !
चाचपते फिरफिरुनी रमणी !
    पाहतेच दर्पणीं !

सरस साधल्या कविता—
    प्रगटे हृदयभाव-माधुरी
पुनः पुन्हा संस्कार तरीही—
    कवी तयांवर करी ! !


## देवदर्शन

मधुर शाम्भवी करुनी प्राशन !
करावयाला शङ्कर-दर्शन ! !–
मित्र उभयतां त्वरें निघाले !
आणि शिरुनिया 'मथुरा-भुवनीं'
रसगुल्ला ते आले झोडुनि ! !

# विरक्ताचे अन्तिमोद्गार

ममतेचे सारे मोहपाश तोडुनी !
राहिलों जन्मभर दूर जगापासुनी !
    हो फोल तपस्या– मनोजय न साधला !
पडुं नको सम्भ्रमीं लिहुन ठेव हें मनीं–
'सफलता न स्त्रीच्या प्रेमाविण जीवनीं ! !'

साक्षरता प्रसार :— ( पृ. ५१ )



शेतकरी सगळ्यांत शहाणा । शब्द तयानें लिहिला— ‘दैना’ !

## साक्षरता-प्रसार

दा. क्र. ६०३८

खेड्यांतिल रात्रीची शाळा !
'मन्त्री' आले तपासणीला !
    'लिहा फळ्यावर शब्द'—म्हणाले.
शेतकरी सगळ्यांत शहाणा
शब्द तयानें लिहिला 'दैना' ! !

---

## विचित्र अट

" आहांत बिचारे कवी तुम्ही सद्गुणी !
तरि होइन तुमची प्रेमळ सहचारिणी !
अट माझी आहे एकच–पण निश्चित
करुं नका एकही ग्रन्थ मला अर्पण !
अन् हक्कहि माझ्या ठेवुं नका स्वाधिन ! ! "

---

## जेवण आणि मरण

“ मेजवानिचा बेत ठरविला !
आणि मित्र हा आजच मेला ! !
समारम्भ थाम्बवा कशाला ?—
सुनीत सुन्दर लिहीन पुढती—
प्रिय मित्राच्या निधनावरती ! ! ”

चावडीसमोरिल लिम्बाच्या खालती
हित शेतकऱ्यांना देशभक्त साङ्गती !—
खादीचे त्यांचे वेष शुभ्र आगळे !
अन् लिम्बावरती जमुनि पहा हे किती—
कावळे उगीचच कर्कश केकाटती ! !

खालीं आणि वर ( पृ. ५४ )



## वस्तुस्थिति

कविता त्याच्या–‘ अरुण ’, ‘कोकिळा’ !
बक्षिस पहिलें मिळे तयांला ! !
कवी म्हणे तो हासत मजला ! —

—‘अरुण’ अजुनि मीं नसे पाहिला !
आणि देखिली कधिं न कोकिळा ! !

## निष्ठुर न्यायाधीश

शब्द मुखांतुन याच्या निघती
अन् फासावर बन्दी चढती !
निष्ठुर न्यायाधीश हा जनीं ! !

सदनीं येतां पुत्रासङ्गे—
' घोडा घोडा '– खेळे-राङ्गे ! !

---

## दैववाद

नवराष्ट्राचा तरुण अग्रणी
प्रखर दरारा त्याचा भुवनीं ! !
'दैववाद' तो सदा निखन्दी !
सङ्ग्रामास्तव निघतां सैन्यें
मातेकरवीं 'करपुतळी' ने
शकुन शुभाशुभ पाही आधीं !

## जुळें

सात कन्यका तिज ओळीनें !
आणि गर्भिणी अतां नव्यानें !
उत्कण्ठित ती पुत्रासाठीं ! !
प्रसूत होतां–काय देखिलें ?
हाय !– मुलींचें जुळें–उपजलें ! !

## दादा लेखराज

‘ तुम्ही पुढें होणार कुणासम ?
कराल साङ्गा कसला विक्रम ?’
—गुरू विचारी ध्येयप्रेमी !
दिलीं मुलांनीं विविध उत्तरें
त्यांत शेवटीं एक उत्तरे—
—‘ होइन ‘दादा लेखराज’ मी ’ ! !

## हलवाई

ख्यात पुरातन हा हलवाई !
जनां रुचेना दुजी मिठाई ! !
– स्वत: कधीं हा कणहि न खाई !
सायङ्काळीं पण नियमानें
खात चुरमुरे—चणे-फुटाणे ! !

जावयाची कामास यांस घाई
सदा म्हणती, 'मज़ भूक मुळीं नाहीं'!
—आणि आजारी असति घरीं ज़ेव्हां
घरामधलें सम्पतें रवा-तूप ! !

## कौतुक

दिण्डी

बाळ बघुनी तें सानुलें सुरेख !
कौतुकें मीं मारिली त्यास हाक !
आणि घेऊं लागलों गोड पापा—
चढे वेगें तें 'बाळ गुणी' कोपा ! !—
म्हणे, 'शाल्या ! मालीन तुला लात
फिलुन जल का मज लावशील हात' ! !

'जें हवें जिवाला तें न जगीं या मिळे'—
माझीच उक्ति ही सार्थ किती हें कळे !
'सन्तोषभुवन' तें—म्हणुनी शिरलों तिथें !
मी म्हणे, 'दुधाचें शीत-पेय' दे मुला !
'तें सरे'—'चहा घ्या फक्कड' तो बोलला !

## पराचा कावळा

तोः— देतेस सखे चुम्बना ?
तीः— हं ! साङ्गुं नका पण कुणा ! !
तोः— —कां भीति कशाची मनीं ?
तीः— जातात 'मित्र' चुम्बुनी ! —
अन् 'भलतें' कथिती जनीं ! ! !

९

## साम्यवाद

सूर्यकान्त

‘साम्यवाद’ हें गूढ गोजिरें अद्याप न उमजलें
व्याख्यानें ऐकिलीं, वाङ्मयहि अद्यावत वाचलें ! !
—सहज एक दिन मित्र कुणी दे भाङ्ग मला प्यावया !
वस्तू वस्तूंतला हळुहळू भेद नष्ट जाहला !
धुन्द आणि बेबन्द वर्तनीं ‘साम्यवाद’ समजला ! ! !

## दोन दगड

श्रीशम्भूच्या पिण्डीवाणी
दगड आढळे कुणास रानीं !
—स्थान स्वयम्भू मग तें ठरलें !
मन्दिर तेथें भव्य उभविलें !
श्री 'दगडा'चें भाग्य उजळलें ! !

–२–

बेकारीनें गांजुन गेला !
सत्याग्रह-सङ्ग्रामीं पडला !
—'थोर पुढारी' –जन मग म्हणती !
दगडाला शेन्दूर फासती !
मन्दमती तो ठरे विभूती !

ठाणे.



अनुदिनीं धाबळी तीच जुनी नेसुनी !
करि प्रदक्षिणा ती तुळसी-वृन्दावनीं ! !

—थाटांत तुळसिचें लग्न काल लागलें !
त्या चिञ्चा आम्बट—मधुर सरस आवळे !—
—तुळसींत पाहतां चित्त तिचें चावळे !

थाम्बलीं पाउलें स्तोत्रमन्त्र विसरले !
'नैवेद्य-सेवनें'—आह्निक आटोपलें ! !

## दोन दगड

श्रीशम्भूच्या पिण्डीवाणी
दगड आढळे कुणास रानीं !
—स्थान स्वयम्भू मग तें ठरलें !
मन्दिर तेथें भव्य उभविलें !
श्री 'दगडा'चें भाग्य उजळलें ! !

—२—

बेकारीनें गांजुन गेला !
सत्याग्रह-सङ्ग्रामीं पडला !
—'थोर पुढारी'—जन मग म्हणती !
दगडाला शेन्दूर फासती !
मन्दमती तो ठरे विभूती !

सं. ...... 
ता. ......
ठा. ग्रं.



अनुदिनीं धाबळी तीच जुनी नेसुनी !
करि प्रदक्षिणा ती तुळसी-वृन्दावनीं ! !

—थाटांत तुळसिचें लग्न काल लागलें !
त्या चिञ्चा आम्बट—मधुर सरस आवळे !—
—तुळसींत पाहतां चित्त तिचें चावळे !

थाम्बलीं पाउलें स्तोत्रमन्त्र विसरले !
'नैवेद्य-सेवनें'—आह्निक आटोपलें ! !

दिण्डी

बङ्गलीचें त्या रम्य बान्धकाम--
नांव वरती झळकतें 'योगधाम' !

योगमार्गी हा धनी असे कोण ?
द्वारफलकीं मीं म्हणुन दिलें ध्यान !

शब्द सोनेरी सुबक अक्षरांत--
कोरिलेले– 'कामदा कलावन्त !'

'अरे ! ही तर– 'ती' नटी-नामवन्त !
(सदा शोधी जी धनिक नवा 'कान्त ! ')

'स्वैर नाचे शृङ्गार 'योगधामीं'
योग नामी हा' बोललों मनीं मी !!

## बाल-नागरिकाचें गाऱ्हाणें

पादाकुलक

क्रमाक्रमानें पेठांमधुनी
नगरसभेचे फिरति अग्रणी !
ऐकत जनतेचीं गाऱ्हाणीं !

विविध तयांना येती अनुभव !
त्यांत एक हा अद्भुत-अभिनव ! !—

चपळ धिटुकला बालक देखा—
पुढें येउनी सभेंत एका—
म्हणे, " आमचें म्हणणें ऐका !
' उगिच डाम्बरी करितां सडका !

विटि-दाण्डूचा खेळ खेळतां
'गल्ल' न येई तिथें खोदतां ! !
अशक्य करिते खेळ बालकां
कसली असली 'नगरपालिका' ?' ! ! "

बङ्गलीचें त्या रम्य बान्धकाम--
नांव वरती झळकतें 'योगधाम' !

योगमार्गी हा धनी असे कोण ?
द्वारफलकीं मीं म्हणुन दिलें ध्यान !

शब्द सोनेरी सुबक अक्षरांत--
कोरिलेले– 'कामदा कलावन्त !'

'अरे ! ही तर– 'ती' नटी-नामवन्त !
( सदा शोधी जी धनिक नवा 'कान्त ! ')

'स्वैर नाचे शृङ्गार 'योगधामीं'
योग नामी हा' बोललों मनीं मी !!

## बाल-नागरिकाचें गाऱ्हाणें

पादाकुलक

क्रमाक्रमानें पेठांमधुनी
नगरसभेचे फिरति अग्रणी !
ऐकत जनतेचीं गाऱ्हाणीं !

विविध तयांना येती अनुभव !
त्यांत एक हा अद्भुत-अभिनव ! !—

चपळ चिटुकला बालक देखा—
पुढें येउनी सभेंत एका—
म्हणे, " आमचें म्हणणें ऐका !
' उगिच डाम्बरी करितां सडका !

विटि-दाण्डूचा खेळ खेळतां
'गल्ल' न येई तिथें खोदतां ! !
अशक्य करिते खेळ बालकां
कसली असली 'नगरपालिका' ?' ! ! "

## अनुकरण

अनुष्टुभ्

प्रेक्षकः—	'पातलास भल्या मित्रा !
कारावासीं कशामुळें ?'

गुन्हेगारः—	''स्पर्धा' थोरांसवें केली–
शिक्षा दीनास ही मिळे ! !'

प्रेक्षकः—	''स्पर्धा' ही कसली ऐसी
मिळे शासन जीमुळें ?–'

गुन्हेगारः—	'सरकारी जसें 'नाणें'–
मींहि तैसेंच पाडिलें ! !
गुणाचें चीज हें झालें--
मज बन्दींत घातलें ! ! !'

तो:— " मध्यरात्रीं दार माझें,
ठेवितों मी मोकळें !
झोपतां 'तो' गाढ, साधी
सन्धि नामी प्रेमले ! !

—कां अशी ही स्तब्धता गे,
कां अशी उद्विग्नता ? "

ती:— " सङ्कटें हीं आड येती
नेहमीं प्रीतीपथीं
—'त्यांस' निद्रानाशव्याधी,
नित्य रात्रीं जागती ! "

*   *   *

ज्यास निद्रानाशव्याधी,
जो सदाचा 'जागता'
तो पती—छे !--तर्क चुकला !
—प्रेमिकेचा तो--पिता ! !

## चन्द्रामावशीचें ताक

ओवी

चन्द्रामावशी आपली आकाशीच्या अङ्गणांत
घुसळण घुसळीते डेरे कसे घुमतात !

निशादेवी शेजारीण आली मागायला ताक
चन्द्रामावशी उदार धाडी कुणा न विन्मुख !

ताक ताजें फेसाळलें वरी लोणियाचे गोळे
निशादेवीच्या भाण्डयांत तिनें हासत ओतीलें !

आणि आनन्दभरांत कसा निसटला हात
डेरा होऊनी उपडा खालीं साण्डलें अमृत !

अङ्गणांतून नभीच्या खालीं ओघळल्या धारा
आकाशीच्या गोरसानें न्हाली सारी वसुन्धरा !

चन्द्रामावशी हासते निशादेवी तिच्यासङ्गें
खालीं-वरी गोरसांत सारी सृष्टीही तरङ्गे !

चन्द्रामावशीचें ताक कोणा कळे न--साण्डलें
रम्य शीतल चान्दणें जन म्हणती पडलें ! !

—१—

असुनिया पुरुष, करि मोहक स्त्री-भूमिका !
सुस्वरें लाजवी नटश्रेष्ठ हा पिका ! !

माण्डुनी 'स्वयंवर' अभिनय करि लाडका !
रसिकांस भासते रतिसम 'नृपबालिका' ! !

—२—

प्रेक्षकांत पुढती विराजते मोहिनी !
ही रसिक-प्रिय विख्यात चित्रचान्दणी ! !

पोषाक करी नखशिखान्त पुरुषापरी
हो नाटकांतल्या लुब्ध नायिकेवरी ! ! !

## 'पुरोगामी' पुणें

चन्द्रकला

–१–

ही बघ रे मित्रा सदाशिव पेठ पुण्यांतील !
आर्यसंस्कृतीचें सनातन पीठ पुण्यशील !

थवे लेखकांचे दाटले याच खुराड्यांत !
त्यांत 'पुरोगामी'– पिसांचा तरुण नवा पन्थ !

–२–

प्रसिद्ध ही दुसरी येथली शुक्रवार पेठ !
करमणुकीसाठीं पाउलें इथेंच वळतात !

—ही दाणेआळी स्थान हें ठेवी ध्यानांत !
स्त्रिया 'पुरोगामी' इथें तर खिडकी-खिडकींत !

## लाडू आणि लघुकथा

चन्द्रकला

चहा 'बादशाहीं' सकाळीं घ्यावयास जातां !
तिथें डिङ्क-लाडू पुढें ये ताजा आवडता !!

—निराश मन झालें घालितां मुखीं आवडीनें
डिङ्क त्यांत थोडा खोबरें भरलें दुपटीनें !!

—आणि घरीं येतां नवें ये मासिक हातांत !
थोर लेखकाची घेतली वाचाया गोष्ट !

कथा न आवडली फेकुनी मासिक मीं दिधलें
—अनुभव तोच पुन्हा इथेंही ! मन कष्टी झालें !

—कथेंत अल्प जरी कथागुण आणि सद्विचार
दुपटीनें दिसती फुल्या अन् आश्चर्योद्गार !!

## कल्पना करा

पादाकुलक

तुळतुळीत गुळगुळित हजामत
फडकें ओलें वर आच्छादित !
सगांठ शेण्डी प्रशस्त लोळत ! !

भव्य देह धिप्पाड सांवळा !
भस्मलेप शोभतो आगळा !
रुद्राक्षाच्या गळ्यांत माळा ! !

जीर्ण धाबळी कमरेभंवतीं !
दर्भ नि झारी घेउनि हातीं !
डुलत निघाले श्राद्धासाठीं ! !—

—दिसतील– गमतिल कसे आपणा–
'अत्रे'– अपुले– करा कल्पना ! !

## प्रौढ कुमारी

ती प्रौढ कुमारी थोर देशसेविका
अर्थातच वक्ती, कवयित्री, लेखिका !

ती म्हणे, 'नराचें दास्य! लग्नबन्धन—!
मज नको ! जन्मभर स्वतन्त्र मी राहिन' ! !

* * *

खिडकींत आपुल्या खिन्न उभी राहुनी
बघतसे काय ती समोर टक लावुनी ?

—हर्षानें कोणी युवति तरुण गोमटी—
स्तनपान करविते अपुल्या छकुल्याप्रती ! !

खळबळे उचम्बळे नाचे लावण्याची नदी !
धाऊं-घेऊं-उडी, बुडी कृपानिधि कोठें आहे ?

गुणसुमनांची माळा गन्ध मोहक आगळा !
भूषवीन ज्याचा गळा नीलकण्ठ कोठें आहे ?

प्रेमभावाचें चन्दन भक्तिभावें उगाळून
अङ्गीं करीन लेपन श्रीरङ्ग तो कुठें आहे ?

चित्तवृत्तीचें स्पन्दन आळवीन गोपगान—
—वेणू अधरीं होऊन बन्सीधर कोठें आहे ?

माझा भोळा-खुळा भाव भिल्लिणीचें उष्टें फळ
मुखीं चाखील वेल्हाळ रघुराज कोठें आहे ?

अहंभावातें जाळून चित्तचक्षु उजळून
मुखप्रभा निरखीन मोहन तो कोठें आहे ?

होऊन मी वसुमती करी प्रदक्षिणा भोंतीं
गगनीची दिव्य दीप्ती गभस्ती तो कोठें आहे ?

# 'सन्त ज्ञानेश्वर'मधील पद्यें

बघ मंगल दिन आला — ( पृ. ८१ )



मुक्ताबाई — ( छोटी सुमित्रा )

## मुंजीचें गाणें

मुक्ता:—बघ मङ्गल दिन आला।
चल चल रे मुञ्ज मुला ॥ ध्रु० ॥

घालुनिया लङ्गोटी।
दण्ड उभा घे हातीं
मग म्हण रे ॐ भवती
चल चल रे मुञ्ज मुला ॥

दर्भानें तव माण्डी चिरतिल
बेटकुळी मग तिच्यांत भरतिल
आंत उड्या ती टुणुटुणु मारिल !
घरभर भरभर गरगर फिरशिल
आला ! आला ! बघ मङ्गलदिन आला ॥

सोपान:—यज्ञोपविता करुनी धारण
गायत्रीचें मन्त्रोच्चारण
ब्रह्मचारी मी गुरुघरीं जाइन
होइन ज्ञानी दिपविन सकला
आला ! बघ मङ्गलदिन आला ॥

मुक्ताः— काशीला तूं निघशील जाया
तुला आडविल मामाराया
बोले, 'देईन कन्या या या'
ब्रह्मचारी मग फिरला फसला ॥
आला ! आला ! बघ मङ्गलदिन आला ॥

## कृष्ण-भक्ति

निवृत्ति—माता, पिता, बन्धू जीवीचा जिव्हाळा।
तूं एक गोपाळा विश्वपाळा ॥

हर्ष, खेद ऐसा नुरे कांहीं भेद
सर्व सुखानन्द तुझ्या पायीं ॥

नाम-मन्त्रें घडे भेद-भ्रम-नाश !
ज़ोडे अविनाश मोक्षसुख ॥

कृष्ण मनीं ध्यानीं कृष्ण जनीं वनीं
भुवनीं गगनीं कृष्ण कृष्ण ॥

निवृत्ती-अन्तरीं कृष्ण-भक्ति दाटे
ओघ अवघा आटे आसक्तीचा ॥

## जन्मभूमीची प्रार्थना

ज्ञानेश्वरः–जननी तव दया ।
वानूं केवीं अमृतमया–
अमृतमया हरीत भवभया ॥ ध्रु० ॥
अङ्कावरी
धरुनी करी
तूंचि राखिले
फिरुनि पाय, दावि माय, लेकुरांस या ॥
दे शुभवर,
पुरवि आस,
दुःख ने लया
नर्मदाः—मुख-कलंक करुनि दूर, लाभुं दे जया

## कशी माया जडते

नर्मदा:—कशी माया जडते अशी जिवाला !
भुलवी वृथा जगाला ॥ ध्रु० ॥
जणुं जाती प्राण दूर ।
हुर हूर दाटे ।
लागे झराया नयनांतुनी जिव्हाळा ॥

* * *

रुतलेले राजहंस ।
हे मुक्त व्हावे ।
वेगें वळावीं 'प्रिय पाउलें' घराला ॥

## आम्ही दैवाचे !

आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी रे ।
करूं काम, स्मरूं नाम, मुखीं राम हरी रे ॥

प्रानावानी पिर्ती रानीं !
जुपुनिया बैल गुनी !
कष्ट क्येल नांगरुनी !

ध्येवाची स्वारी आली मिर्गावरी रे ! ॥

धान्याची पेर झाली !
लक्षुमिनं किर्पा केली !
मोत्याची रास दिली !

शिवारी पीक डोले राजापरी रे ! ॥

नाचत्याती पोरं थोरं !
बागडती गुरंढोरं !
चला जाऊं सम्द्याम्होरं !

बिगी बिगी बिगी गाडी हाकूं खळ्यावरी रे ! ॥

ओव्या

पहिली स्त्री:—गुढ्या-तोरणें शोभती हर्ष नाचे घरोघरीं !
हरीनामाच्या गजरीं दुमदुमली नगरी ॥

दुसरी स्त्री:— सृष्टी न्हाली सोनियानें-- उगवले भानुदेव !
आनन्दली अलकानगरी--घरा आले ज्ञानदेव ॥

## चाङ्गदेवाची आरती

जयदेव जयदेव जय योगीराजा।
दिपला दिनकर पाहुनि दिव्य तुझ्या तेजा ॥
सिद्धी अवध्या तुझिया चरणाच्या दासी।
प्रगटति मन्त्रोच्चारें वैभवसुखराशी ॥
चक्रपाणी चाङ्गा, श्री सिद्ध चाङ्गा।
शिवयोगी चाङ्गा, मणिसिद्ध चाङ्गा ॥
निश्चळदास चाङ्गा, अनकर चाङ्गा।
नागेश चाङ्गा, श्रीमुधेश चाङ्गा ॥
सत्यसिद्ध चाङ्गा, विद्यावयवी चाङ्गा।
बुटी चाङ्गा तैसा नाहमा चाङ्गा ॥
चाङ्गदेव चाङ्गा, वटेश्वर चाङ्गा—
चौदा नामें वाहे तव महिमा-गङ्गा ॥
योगबळें जो जिङ्की दुर्जय मृत्यूतें।
निर्भय सुखमय करुनी रक्षी भक्तांतें ॥
ओवाळूं आरती श्रीयोगीराजा।
दिपला दिनकर पाहुनि दिव्य तुझ्या तेजा ॥

## प्रार्थना

ज्ञानेश्वर—चरण-शरण देवा !
अर्जुन जणुं शोकाकुल !
भक्तहृदय मोहविकल !
त्वरित सुपथ दावा ! धावा !

## आनन्द आनन्द

आनन्द आनन्द अवघा आनन्द आगळा !
गोविन्द गोविन्द अवघा मुकुन्द सांवळा !
बहुता दिसांचें तप ये फळाला !
धावुनी भक्तासाठीं घननीळ बोळला !
कृष्णघन बोळला !
बाहेरीं भीतरीं अवघा आनन्द-सोहळा ! !

# आवश्यक टीपा

पृ. १—कल्चर्ड मोतीं—

ओळ ९- १ मुखरङ्ग— पान-तंबाकू खाणाऱ्या लोकांकडे मिळतो.

ओळ १४- २ टोप्या— French Caps हें रहस्य सुशिक्षितांना सांगणें नकोच.

ओळ शेवटची- 'हिरवा धागा'— हें व्यापारी 'बोधचिन्ह' विडीबाजांच्या परिचयाचें आहे.

पृ. ३—जीव द्यावयाचें विसरलों—ही कविता प्रसिद्ध झाल्यावर फार-जणांना आवडली. 'झारापकर'च्या ज्या अंकांत ती प्रसिद्ध झाली त्यांत पुढील 'गंभीर' स्वरूपाचा मुद्रण दोष झाला होता—

शेवटची ओळ—'घडो......मजपरी प्रेमभंग जगती' अशी आहे. त्या ऐवजीं छापतांना 'घडो अनेकांचा 'मजवरी'' असें छापलें गेलें होतें.

पृ. ५—श्वानविलाप—हृदय ज्याचें — न्हालें —

ओळ ९— ज्ञानेश्वरींतील पुढील ओवी पहा—

" यालागी दुष्कृती जरी जाहला ।
तरी अनुताप-तीर्थीं न्हाला ।
न्हाउनि मज आंत आला । सर्व भावें ॥ "

(ज्ञाने. अ. ९, ओवी ४२०.)

पृ. ६—आह्मी माणसें आपण— प्रस्तुत कवितेंत प्रभातच्या 'माणूस' चित्रकथेचा संदेश (दिग्दर्शकाला अभिप्रेत असलेला) योग्य

शब्दांत ग्रथित झाला आहे, असा अभिप्राय श्री. व्ही. शान्ताराम यांनीं प्रकट केला होता.

पृ. १२—**अर्वाचीन कौसल्येचे डोहाळे**—प्रस्तुत कविता स्त्रीवर्गांत अतिशय लोकप्रिय झाली. लेखकाच्या विवाहानंतर कांहीं महिन्यांनीं ती प्रसिद्ध झाली. तेव्हां ती स्वानुभवावरूनच सुचली असली पाहिजे असें कांहीं 'रसिकां'नीं ध्वनित केलें. पण वस्तुस्थिति तशी नाहीं.

पृ. १५—**मुद्दयाची गोष्ट**—'गंभीर' स्वरूपाच्या सुनीतांपेक्षां वेगळ्या पद्धतीनें हें 'सुनीत' लिहिण्याचा प्रयत्न आहे. अखेरच्या दोन पंक्तींतील कलाटणी Anti-Climax पद्धतीची आहे.

पृ. १८—**एका अमेरिकन मुलीचा हट्ट**— मुळांत ही मुलगी अमेरिकन नव्हती पण श्री. के. नारायण काळे यांनीं कविता वाचल्यावर हें आपल्या समाजांतील चित्र नाहीं असा कांहींसा अभिप्राय प्रकट केल्यामुळें तिला अमेरिकन बनवावी लागली.

पृ. २२—**गौळण**— जुन्या कल्पनेला नवें वळण देऊन ही कविता लिहिली आहे. पहा—

दुडीवरी दुडी सातें निघाली । गौळणी गोरस म्हणों विसरली ॥
गोविंद घ्यावो, दामोदरू घ्यावो । तंव बोलती मथुरेच्या नारी वो ॥
(पांगारकरकृत 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड १ला, पृ. ६०४.)

पृ. २४—**Quo Vadis** नांवाचा इंग्रजी चित्रपट.

पृ. २८—**प्रीति आणि शक्ति**— प्रस्तुत कविता स्वानुभवाच्या पोटींच जन्माला आली असावी असा कयास कांहीं रसिकांचा आहे !

पृ. ३७—**'शेतकरी आणि भाई'**— प्रस्तुत कविता प्रसिद्ध झाल्यावर ती लिहिण्यांतील लेखकाच्या हेतूचा विपर्यास झाल्याचें आढळून आलें. लेखकाला या कवितेंत शेतकऱ्यांची स्तुति व 'भाई'चा निषेध प्रिय नाहीं. लेखकाचा रोख कांहीं अर्धवट 'भाई'च्या-

अज्ञानावर आधारलेल्या प्रगतिप्रियतेवर– चळवळीवर– स्वार्थ-त्यागावर आहे. ज्या शेतकऱ्यासाठीं हे समाजसेवक राबतात त्या– शेतकऱ्याच्या जीवनाचा अभ्यास त्यांनीं केलेला नसतो– शेतकऱ्याची परिस्थिति किंवा सुखदुःखें त्यांना नीटशीं माहीतहि नसतात.

पृ. ४९—शाम्भवी–शंकराचा प्रसाद—भांग.

पृ. ५०—एका विरक्त योग्यानें अन्तकालीं आपल्याजवळच्या शिष्याला दिलेला सन्देश !

पृ. ५३—प्रस्तुत कविता प्रसिद्ध झाल्यावर तशीच एक सत्यकथा–एका थोर लेखकाच्यासंबंधीं ऐकण्यांत आली.

पृ. ५४—केवळ एक दृश्य रेखाटण्यापलीकडे या कवितेंत लेखकाला विशेष कांहींहि ध्वनित करावयाचें नाहीं.

पृ. ५७—करपुतळी—काशाची थाळी घेऊन त्यावर नीरांजनाची काजळी धरतात. ती थाळी–पुढें ठेवून पायाळू स्त्री किंवा पुरुष भविष्य कथन करूं शकतो. इंग्लंड-अमेरिकेंतहि क्लेरोव्हायन्स नांवाचा याच नमुन्याचा एक प्रकार आहे.

पृ. ५९—दादा लेखराज—स्वतःला श्रीकृष्णाचे अवतार म्हणवून आपल्या-भोंवतीं समाजांतील प्रतिष्ठित व सुंदर स्त्रिया व मुली 'गोपी' म्हणून जमवून रासक्रीडा करणारे एक 'आधुनिक सत्पुरुष'! या सत्पुरुषानें 'ॐ मंडळ' नांवाची संस्था स्थापन करून कराची येथें मध्यंतरीं चांगलाच धुमाकूळ घातला होता, हें वाचकांच्या लक्षांत असेलच!

पृ. ६२—कौतुक—श्री. राजा नेने यांनीं सांगितलेल्या एका सत्यकथेचा या चुटक्यास आधार आहे !

पृ. ६३—'जें हवें जिवाला तें न जगीं या मिळे' पहा—'एकलें बीज'– पान १६ 'आभास' ही कविता !

पृ. ६९—पुण्याचे नागरिक या बालनागरिकाचें विशेष कौतुक करतील !

पृ. ७३—विपरीत रति—माण्डुनी 'स्वयंवर'—गंधर्व नाटक मंडळी करीत असलेलें 'स्वयंवर' नाटक ! नृपबालिका—भीष्मक राजाची कन्या रुक्मिणी.

पृ. ७४—ही कविता प्रसिद्ध झाल्यावर कांहीं मित्रांनीं माझा निषेध केला ! कांहींनीं पत्रानें कळविलें, कीं 'अशा कविता लिहिण्यास योग्य असे इतर पुष्कळ लेखक आहेत. 'एकलें बीज'कारांनीं अशा कविता लिहून आपली लेखणी विटाळूं नये.'

पृ. ७५—बादशाही—पुण्याच्या टिळक रोडवरील एक नमुनेदार विश्रांतिगृह. या उपाहारगृहांतील सारा माल स्वच्छ व अतिशय रोचक असतो. थोर लेखकाची—य. गो. जोशी नव्हेत !

ज्ञानेश्वरांतील पद्यांपैकीं—'कशी माया जडते', 'जननी तव दया' हीं चित्रपटांत गाळण्यात आलीं आहेत.

## 'एकलें बीजा'चा प्रामाणिक गौरव

### महर्षि अण्णासाहेब कर्वे यांचे उद्गार

पुणें, ता. ३०-३-३९

कृ. सा. न. वि. वि.—

मीं मंडळाच्या वर्गणीसाठीं फिरत फिरत आपणांकडे आलों त्या वेळीं आपण वर्गणी दिली व आदरपूर्वक भेट म्हणून आपलें पुस्तक 'एकलें बीज' दिलें. मीं अरसिक असल्यामुळें कवितावाचनाचा नाद मला नाहीं; इतर वाचनहि बेताचेंच. ह्यामुळें आपलें पुस्तक तसेंच पडून राहिलें. थोड्या दिवसांपूर्वीं माझी एक जुनी विद्यार्थिनी मजकडे आली तिच्या नजरेस तें पुस्तक पडलें. तिनें असें सुचविलें कीं माझें वाचून झाल्यावर मीं तें, प्रसिद्ध पार्वतीबाई आठवले यांची नात उषा आठवले ... ... ... हिला द्यावें. तिनें हें सांगितल्यावर इतके दिवस तें बुक मीं तसेंच ठेवून दिलें ह्याची मला लाज वाटली व दररोज थोडें थोडें याप्रमाणें मीं तें अथपासून इतिपर्यंत वाचलें. पहिला खंड मला फार आवडला. कांहीं पद्यें अत्यंत हृदयस्पर्शी आहेत व तीं मीं दोनदोनदां—तीनतीनदां घोळून घोळून वाचलीं. पहिल्या खंडांतील पद्यांच्या चाली साध्या व माझ्या आटोक्यांतल्या वाटल्या. मी सिनेमाला फारच क्वचित जाणारा असल्यामुळें दुसऱ्या खंडांतील पद्यांच्या चाली मला लागल्या नाहींत व त्यांनीं माझें मन वेधलें नाहीं. आतां पहिल्या खंडांतील पद्यें मी आपल्या पत्नीला वाचून दाखवीन. आपल्या देणगीचें व्हावें तसें चीज माझ्या हातून झालें नाहीं याबद्दल वाईट वाटतें.

आपणांला पत्र लिहिण्याकरतां आपला पत्ता आपल्या पुस्तकांत पाहूं लागलों तो कोठेंच सापडेना; पण आपण पुस्तक देतांना जो त्यावर लेख लिहिला आहे, त्याचेखालीं तारीख लिहिली आहे; तीवरून त्या तारखेचा जमाखर्च पाहतां आपली वर्गणी जमा असून तेथें घर नंबर व पेठ ह्यांची नोंद केलेली आहे. तीवरून पत्रावरचा पत्ता लिहिला आहे. आपण तेथें नसलां तरी आपलेकडे पत्र रवाना होईल असें वाटतें.

—— धोंडो केशव कर्वे

# 'एकलें-बीजा'चे रसिकांचें रसग्रहण

...... 'एकलें बीजा'चे निरीक्षण केल्यास रसिकांच्या वृत्ति उल्हसित होतील अशीच रचना सर्वत्र आढळते. ......!

...... कवि शान्ताराम यांचें यश (पद्यरचनेंतील) मला पुष्कळच श्रेष्ठ प्रतीचें वाटतें. आजच्या पद्यलेखकांत आज तरी ते पहिले आहेत!

— **ना. ह. आपटे**

...... आपण बोलपटासाठीं रचलेलीं गोड पदें मला हेवा करण्याइतकीं चांगलीं वाटतात.

— **अनन्त काणेकर**

शान्ताराम यांच्या काव्याचे सकृद्दर्शनींच ध्यानीं येण्यासारखे गुण म्हटले म्हणजे ...... प्रसन्नता, रचनासौष्ठव आणि सुगम भाषाशैली ......

व्यापक दृष्टीनें समाजाच्या आजच्या आशा-आकांक्षा काय आहेत तें पाहून काव्यरचना करणारे ते समाजवादी कवि आहेत ही गोष्ट कौतुकास्पद आहे.

— **विविधवृत्त,** ८ जानेवारी १९३९

...... 'प्रभात'च्या कलाकृतींचें जें आगळें सौंदर्य रसिकांच्या दृष्टीस सुखवितें त्याचें श्रेय दिग्दर्शक शान्तारामांप्रमाणेंच कवि शान्तारामांकडेहि बरेंचसें आहे यांत शंका नाहीं. ......

...... प्रसाद हा गुण शान्तारामांच्या काव्यांत कांठोकांठ भरलेला आढळतो ......

...... देवलांची प्रसन्नता 'बीज'कारांच्या लेखणींत पुन्हा अवतीर्ण झाली आहे असें वाटूं लागतें!

— **केसरी,** १७ जानेवारी १९३९

...... बहुजनसमाजाला पटेल, सामान्य जनतेच्या मनाची पकड बरोबर घेईल आणि आबालवृद्धांच्या तोंडीं बसून त्यांना सतत गुणगुणावयाला लावील अशी सुलभ आणि ध्येयवादी काव्यनिर्मिति करण्यांत बोलपटसृष्टींतच काय पण वाङ्मयसृष्टींतहि श्री. आठवले यांची बरोबरी करणारे कवि फारच विरळा—

— **ज्ञानप्रकाश,** अग्रलेख,
२० जानेवारी १९३९

......श्री. आठवले यांची रचना सुश्लिष्ट, गेय आणि रसपूर्ण आहे. ... कांहीं छोट्या कवितांतून भावनेची उत्कटता आणि उपरोध यांचें हृदयस्पर्शी मिश्रण झालेलें आढळतें. ......

'आजच्या पद्यलेखकांत आज तरी ते पहिले आहेत.'– हे नारायणराव आपटे यांनीं त्यांच्याविषयीं काढलेले उद्‌गार कोणालाहि पटतील. या पुस्तकामुळें मराठींत एका उत्तम काव्यग्रंथाची भर पडली आहे.

— महाराष्ट्र, नागपूर,
७ मे १९३९

श्री. शान्ताराम आठवले यांचा हा संग्रह रसिकांना मनोहर वाटण्याजोगा आहे.

— किर्लोस्कर, एप्रिल १९३९

सर्व प्रकृतींच्या वाचकांना हा काव्यसंग्रह आवडेल यांत शंका नाहीं.

— 'कला' मासिक, गोवें

...... 'एकलें-बीज' या काव्यसंग्रहाच्या परीक्षणास योग्य अशी शब्दसंपत्ति मजजवळ नाहीं. ...... प्रस्तुत काव्यसंग्रह इतका थोर दर्जाचा आहे, कीं त्याच्या महत्त्वमापनास (महत्त्वमापन करण्याची माझी कला) पुरी पडणें फार कठीण आहे असें मला वाटतें.

— शरच्चंद्र, लोकशक्ति,
१५ जानेवारी १९३९

६०३८

# एकलें बीज

**शान्ताराम आठवले यांचा लोकप्रिय कवितासंग्रह**

सुमारें ६५ उत्कृष्ट भावकविता

प्रभातच्या 'अमृतमंथन', 'तुकाराम', 'कुंकू', 'गोपाल-कृष्ण', 'माझा मुलगा' या बोलपटांतील अत्यंत लोकप्रिय गाणीं. ना. ह. आपटे यांची विचारपरिप्लुत प्रस्तावना.

किंमत १॥ रु. सर्वत्र मिळतें.

प्रकाशक :— य. गो. जोशी

## एकलें बीज

शान्ताराम आठवले यांचा लोकप्रिय कवितासंग्रह

सुमारें ६५ उत्कृष्ट भावकविता

प्रभातच्या 'अमृतमंथन', 'तुकाराम', 'कुंकू', 'गोपाल-कृष्ण', 'माझा मुलगा' या बोलपटांतील अत्यंत लोकप्रिय गाणीं. ना. ह. आपटे यांची विचारपरिप्लुत प्रस्तावना.

किंमत १॥ रु. सर्वत्र मिळतें.

प्रकाशक :—य. गो. जोशी

# आमचीं प्रकाशनें

| | किंमत |
|---|---|
| समग्र केळकर-वाङ्मय | ५० रु. |
| तिरंगी नवमतवाद्-श्री. न. चिं. केळकर | १० आ. |
| विस्तवाशीं खेळ-प्रो. वा. म. जोशी | १ रु. |
| फ्रेंच राज्यक्रांति-श्री. न. चिं. केळकर | २ रु. |
| हास्य-विनोदमीमांसा-श्री. न. चिं. केळकर | ४ रु. |
| सहारा-श्रीधर गो. देशपांडे | १ रु. |
| बलिदान-श्री. न. चिं. केळकर | २ रु. |
| राका-सौ. संजीवनी मराठे | १ रु. |
| प्रतारणा-प्रो. वि. पां. दांडेकर | १॥। रु. |
| संसार-सोपान-सौ. गिरिजाबाई केळकर | १ रु. |
| न्याहारी-श्री. वि. म. कुलकर्णी | १ रु. |
| वादळी वारे-प्रो. द. के. केळकर | १ रु. |
| उन्माद्-प्रो. ना. सी. फडके | २॥ रु. |

**सौ. गिरिजाबाई केळकर यांची पहिली कादंबरी लवकरच प्रसिद्ध होईल.**

पत्ता- मनोहर ग्रंथमाला, पुणें २.

मनोहर ग्रंथ-माला, पुष्प १३ वें : किंमत २ रुपये.

प्रो. द. के. केळकरकृत

# वादळी वारे

(विचारक्षोभक मतमतांतरांचें दिग्दर्शन व परीक्षण)

"पाश्चात्यांच्या ओंजळीनें पाणी न पितां स्वतंत्र विचार करणारे सुशिक्षित एकंदरीनें विरळाच. सुदैवानें प्रो. केळकर हे अशा विरळा लोकांपैकीं आहेत म्हणूनच त्यांच्या या लेखसंग्रहाचें मोल विशेष आहे. सर्वच लेखांतील विचार-सरणी व मांडणी ही कोणाच्याहि मनाची पकड घेईल अशीच आहे. किंबहुना ग्रंथकाराच्या लेखनाचा हा एक विशेषच आहे. लेखकाची भाषाहि ओघवती व आवेशयुक्त असल्यानें पुस्तक एकदां हातीं घेतलें असतां तें संपविल्या-शिवाय बाजूला करावेंसें सहसा वाटणार नाहीं."

—महाराष्ट्र

"वैचारिक प्रगतीच्या दृष्टीनें मराठी वाङ्मय-संसारांत बहुमोल भर टाकणाऱ्या या निबंध-संग्रहाकडे मराठी टीका-कारांचें अजून लक्ष गेलें नाहीं ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. सर्वसाधारण वाचक-वर्गाच्या हातीं हा ग्रंथ जाण्यासाठीं या ग्रंथाची सर्वत्र प्रसिद्धि होणें जास्त जरूर आहे."

—लोकमान्य

REFBK-0006038
REFBK-0006038